प्राथमिक शिक्षण विभाग, जि.प.सोलापूर
जा.क्र.जिपसो/शिक्षण/प्राशि-५/९६४/२०२३
सोलापूर दिनांक१४/०२/२०२३

प्रति,

व्यवस्थापन,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
जि.प. सोलापूर

विषय:- जि.प.सेस योजना सन २०२२-२३ अंतर्गत शिक्षण विभाग(प्राथ) कार्यालयासाठी खुर्च्या खरेदी साठी दरपत्रक मागणी बाबत.

वरील विषयान्वये जि.प.सेस योजना सन २०२२-२३ अंतर्गत शिक्षण विभाग(प्राथ) कार्यालयासाठी खुर्च्या खरेदी या योजने अंतर्गत प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने कार्यालयीन खुर्च्या खरेदीसाठीचे दरपत्रक मागणी प्रपत्र सोबत देण्यात आलेले आहे. सदर दरपत्रक मागणी जि.प.च्या संकेतस्थळावर प्रसिद्धीस देण्यात यावे.

**शिक्षणाधिकारी(प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

# दरपत्रक मागणी

शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प.सोलापूर यांचे मार्फत **शिक्षण विभाग (प्राथ) कार्यालयासाठी खुर्च्या खरेदी करणे** ही योजना कार्यान्वीत करण्यासाठी **खालील बाबींचे दरपत्रक मागविण्यात येत आहेत.**

**साहित्याचे नांव:-** १) कार्यालयासाठी खुर्ची

वरील बाबींचे **दरपत्रक** दिनांक २२/२/२०२३ पर्यंत **शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सोलापूर** यांचे नावे व पत्यावर बंद लखोट्यात दुपारी ३.०० वाजेपर्यंत देण्यात यावेत.

**अटी व शर्ती**

१) PAN card आवश्यक आहे.

२) वैध शॉप अॅक्ट / आधार नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे.

३) साहित्य पुरवठयामध्ये कोणत्याही प्रकारचा खंड पडला तरी निर्धारीत वेळेत साहित्य पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील. तसेच अर्धवट झालेल्या पुरवठ्याचे देयके आदा केली जाणार नाही व एखादया वेळी काही कारणास्तव देयक अदा करण्यास उशीर झाल्यास त्यावरील व्याज दिले जाणार नाही.

४) लेखा परिक्षणात कोणत्याही प्रकारची रक्कमेची वसूली निघाल्यास ती या कार्यालयाने कळविल्यानंतर एक महिन्याच्या आत आपणास शिक्षण विभाग (प्राथमिक) या कार्यालयात जमा करावी लागेल.

५) सदर बाबत कोणताही वाद उद्‌भवल्यास त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचा निर्णय अंतिम समजण्यात येईल. न्यायालयीन प्रक्रिये बाबत कोणताही दावा उद्‌भवल्यास तो सोलापूर येथील न्यायालयातच सोडविला जाईल. **(वरील साहित्याचे दर हे सर्व कर व वाहतुक खर्चासह प्रतीनग प्रमाणे दरपत्रकात नमुद करावेत)**

६) साहित्य पुरवठ्यासंबंधी अंतिम निर्णय शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सोलापूर यांचा राहील.

- निविदा धारकांना प्राधिकाऱ्यांनी वेळोवेळी निर्गत केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील
- दर पत्रक लखोटा दिनांक २२/२/२०२३ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता किंवा कार्यालयीन सोयीच्या दिवशी उघडणेत येणार असुन सदर वेळी निविदा धारकांनी उपस्थित रहावे.
- खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाधारकांची हमीपत्र सोबत बंद लखोट्यात देणे आवश्यक आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**